नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/०९/२०२६ (गुरूवार)

.............................................................................................

## मोबाईल चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी निष्पन्न
## ३ आरोपी अटक,
## ११ मोबाईल सह २ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, उमरेड यांच्या नेतृत्वात **उमरेड पोलीसांनी मोबाईल चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला निष्पन्न करून ३ आरोपींना अटक केले असुन ११ मोबाईल एकुण २,८९,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल मोबाईल चोरीच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान उमरेड पोलीसांना गोपनीय बातमीदार द्वारे माहीती मीळाली की, उमरेड येथील आठवडी बाजारातुन मोबाईल चोरी करणारे आरोपी अनुक्रमे १) शेख बाब्बर शेख अस्लम, वय. २६ वर्ष, रा. डाक बंगला पोष्ट, महाराजपुर, तह. राजमहल, जि. साहेबगंज (झारखंड) , २) शेख ओजीत शेख आलम, वय २४ वर्ष, रा. अझमपूर गोला, तह. मनिहारी, जि. कटिहार (बिहार), ३) अभिषेक संजय पोद्दार, वय. २८ वर्ष, रा. महाजन टोली, राजमहल, जि साहेबगंज (झारखंड) हे नागपुर येथे आहे. उमरेड पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन यांच्या कडील तांत्रिक मदतीने तात्काळ नमुद सर्व आरोपींना वाठोडा नागपूर येथुन ताब्यात घेवुन दिनांक १२/०९/२०२६ रोजी अटक केली. त्यांच्याकडे कौशल्यपुर्व तपास केला असता नमुद आरोपी यांनी नागपूर शहर आणि आजूबाजुच्या शहरात गर्दीच्या ठिकाणी, कार्यक्रम स्थळी, मुख्यता आठवडी बाजारात जाउन चोरी करीत असल्याची माहीती दिली.**

तसेच वरील प्रमाणे चोरी केलेले मोबाईल हे झारखंड, बिहार पश्चिम बंगाल राज्यात विक्री केल्या जात असल्याची माहीती आरोपींकडून प्राप्त झाली आहे.

उमरेड पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दाखल गुन्हयातील मोबाईलसह ११ मोबाईल एकुण किंमत २,८९,००० /—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा सखोल तपास करीत आहेत.



# दुचाकी चोरीचा गुन्हा उघड
# २ दुचाकी जप्त
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, उमरेड यांच्या नेतृत्वात **उमरेड पोलीसांनी दुचाकी चोरीचा गुन्हा उघड करून २ दुचाकी एकुण ८५,०००/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला आहे.**

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत फिर्यादी नामे गणेश रामकृष्ण वाघामारे, वय ३९ वर्ष, रा. गागांपुर उमरेड यांनी तक्रार दिली की, फिर्यादी यांनी दिनांक ०९/०९/२०२६ रोजी दुपारी ०३/०० वा. दरम्यान बुट्टीबोरी रोडवरील मधुबन कॉन्हेंट च्या बाजुला असलेल्या शेतामध्ये त्यांच्या मालकीची ज्युपीटर गाडी क्र. एम. एच. ४० डि.के. ३५१२ उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांची दुचाकी किंमती ४५,०००/— रुपये चोरून नेली. अश्या फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस कलम ३०३ (२), भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर गुन्हयाचे तपासादरम्यान दिनांक १७/०९/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना सदर गुन्हयातील चोरी करुन नेलेली दुचाकी ही एका अल्पवयीन बालक व त्याचा एक साथीदाराकडे असुन ते पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीत फिरत आहे अशी गोपनिय माहीती प्राप्त झाली. उमरेड पोलीसांनी विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याच्या साथीदारासह सदर गुन्हा केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष वरील गुन्ह्यात चोरी गेलेली ज्युपीटर गाडी क्र. एम. एच. ४० डि.के. ३५१२ किंमती ४५,०००/— रुपये तसेच याव्यतिरीक्त अजुन एक दुचाकी स्प्लेंडर क्र. एम.एच. ४९ बि. क्यु. ९६२२ किंमती ४०,००० /— रुपये मिळुन आल्याने दोन्ही दुचाकी वाहने असा एकुण किंमती ८५,००० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



# १२ तासाच्या आत ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा उघड
# संपुर्ण मुद्देमाल जप्त
# मोहपा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मोहपा** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री ईश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांच्या नेतृत्वात **मोहपा पोलीसांनी १२ तासात ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा उघड करून एकुण १,५०,०००/— रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त करत एका आरोपीला अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत दिनांक १६/०९/२०२६ रोजी फिर्यादी नामे चंद्रशेखर शामरावजी टेकाडे, वय ४२ वर्ष, रा मोहपा वार्ड क्र १७, ता कळमेश्वर , जि नागपुर यांनी पोलीस स्टेशन मोहपा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दिनांक १३/०९/२०२६ ते दिनांक १४/०९/२०२६ च्या दरम्यान फिर्यादीच्या घराच्या मागे खाली जागेत ठेवलेले फिर्यादीच्या मालकीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र एम.एच.४०—एल ८७४९ किंमती १,००,०००/— रुपये आणि त्याला जोडलेली ट्राली एमएच ४० ए के ३०३६ किंमती ५०,०००/— रुपये

एकुण किंमती १,५०,०००/— रुपयांचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरी केला आहे. फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मोहपा येथे कलम ३०३ (२) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

**मोहपा पोलीसांनी अवघ्या १२ तासाच्या आत सदर गुन्हयाची उकल करून तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी रूपेश मोहनसिंग मेहरा , वय २२ वर्षे, रा. बनवारी, ता. पिपरीया, जि होशंगाबाद याने सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. नमुद निष्पन्न आरोपीचा तात्काळ शोध घेत नमुद आरोपीला १७/०९/२०२६ रोजी रामपुरी, ता. सावनेर येथुन ताब्यात घेवुन अटक केले आरोपीच्या ताब्यातुन ट्रॅक्टर क्र एम एच ४० एल ८७४९ किंमती १,००,०००/— रुपये आणि त्याला जोडलेली ट्राली एम एच ४० ए के ३०३६ किंमती ५०,०००/— रुपये एकुण किंमती १,५०,००० /— रुपयांचा चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त केला आहे.**



# ५ तासाच्या आत चोरीचा गुन्हा उघड
# संपुर्ण मुद्देमाल जप्त
# भिवापुर  पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी भिवापुर यांच्या नेतृत्वात **भिवापुर पोलीसांनी ५ तासात चोरीचा गुन्हा उघड करून एकुण ३५,०००/— रूपयांचा सोन्याचा ऐवज जप्त केला आहे.**

पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत दिनांक १६/०९/२०२६ रोजी फिर्यादी अरुण वासुदेव मांडवकर, वय ६० वर्षे, रा. खोलदोडा, ता. भिवापूर जि. नागपूर, यांनी तक्रार दिली की, दिनांक १३/०९/२०२६ रोजी सकाळी ०७/०० वा. फिर्यादीची पत्नी मुलीकडे नागपूर येथे गेली होती. फिर्यादी घरात एकटे होते. दिनांक १४/०९/२०२६ रोजी फिर्यादी यांना त्यांच्या घरातुन ३.७ ग्रॅम सोन्याची अंगठी चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०५ (अ), ३३१ (४) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलीसांना फिर्यादी यांच्या घरी दिनांक १४/०९/२०२६ दुपारी १२/०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचा मामेभाऊ आरोपी  मनोहर धनराज शंभरकर, वय ४१ वर्षे हा लपत छपत घरातुन बाहेर पाडतांना दिसल्याची माहीती प्राप्त झाली. त्या आधारे पोलीसांनी अवघ्या ५ तासात सदर माहीतीची पुष्टी करत आरोपीला ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची माहीती दिली. भिवापुर पोलीसांनी अवघ्या ०५ तासाच्या आत गुन्हयाची उकल करत ३.७ ग्रॅमची सोन्याची अंगठी  किंमती  ३५०००/— रूपये आरोपीकडून जप्त केली आहे.**

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# दोन वाहनामधील ८ गोवंश जनावरांची सुटका,
# स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदाः—** दिनांक १६/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहीती प्राप्त झाली की, मौजा मौदा गुमथाळा मार्गे भोवरी गावावकडे बोलेरो पिकअप मध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने पोलीस स्टेशन वडोदा हद्दीतील मौजा भोवरी गावातील चौकात नाकाबंदी केली असता संशयीत **वाहन क्र १) बोलेरो पीकअप क्र. एम एच ३६ एबी २४७८ आणि वाहन क्र २) बोलेरो पीकअप क्र एम एच ३६ ए ए ५२४७ हे दोन वाहन मिळुन आले.** वाहन क्र १) **चा चालक आरोपी समीर अन्नाजी तिजारे, वय २१ वर्षे रा. नांदोरी, ता.जि भंडारा आणि** वाहन क्र २) **चा चालक आरोपी सुभाष रामदास शेंडे, वय २६ वर्षे रा. लावेश्वर, ता.जि भंडारा मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष दोनही वाहनाची तपासणी केली असता दोन्ही वाहनात प्रत्येकी ४ असे एकुण ८ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करत अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने किंमती १०,००,०००/— रूपये आणि ८ गोवंश जनावरे किंमती ८०,००० /— रूपये असा एकुण किंमती १०,८०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. नुमद प्रकरणी वाहन चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द ११(१) (अ) (ड) (फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, ५ (अ), (१) (२), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ५ गोवंश जनावरांची सुटका, बेला पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बेला :— दि. १६/०९/२०२६ रोजीचे बेला पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, शेडेश्वर सिंगोरी मार्गे अवैध्यरित्या गोवश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच बेला पोलीसांनी तात्काळ सदर वाहनाची शोध मोहीम सुरू केली,मौजा सिंगोरी येथे पिकअप वाहन क्रं एमएच ४०—सिएम २०९७ हे संशयीत वाहन मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ५ गोवंश जनावरे (गोऱ्हे) अत्यंत निर्दयतेने कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) पिकअप वाहन क्रं एमएच ४० सि एम २०९७ किंमती ७,००,०००/— रुपये २) ५ गोवंश जनावरे किंमती ५०,०००/— रुपये असा एकुण ७,५०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपी चालक ०१) तुषार कवडूजी पेंदाम, वय २६ वर्षे, रा. कळमना, ता. उमरेड, जि. नागपूर आणि ०२)

दिवाकर खेमराज खोडे, वय २७ वर्षे, रा. कळमना त. उमरेड जि. नागपुर यांचे विरुद्ध कलम ११(१) (ड), ११(१) (इ), ११(१) (एफ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत वाहतूक सुरक्षा व अंमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन

दिनांक १७/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत वाहतूक सुरक्षा तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सदर जनजागृती रॅलीमध्ये नगर परिषद शाळा, प्रताप माध्यमिक शाळा, नागपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तसेच गुरुनानक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थी व शिक्षक वर्ग सहभागी झाले होते. कळमश्वेर शहरातील मुख्य रस्ते व चौकातुन सदर जनजागृती रॅली काढण्यात आली होती. रॅलीदरम्यान नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना सुरक्षितता, वाहतूक शिस्त, नियम तसेच अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध जनजागृतीपर घोषणांच्या माध्यमातून नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे तसेच अमली पदार्थापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

सदर जनजागृती रॅलीमध्ये पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर,सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत नारमोड, पोलीस उपनिरीक्षक प्रविण घोडाम, पोलीस उपनिरीक्षक मन्नान नौरंगाबादे, पोलीस हवालदार रविंद्र बांबल, पोलीस हवालदार चेतन राऊत, पोलीस अंमलदार सुखदेव धुळधुळे,योगेश तितरमारे यांच्यासह १२० विद्यार्थी, ०६ शिक्षक उपस्थित होते.






जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर